# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक क्र.२५०/२०२४

**विषय :** **संशोधन मार्गदशकांकडे रिक्त असलेल्या जागांची माहिती अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :**
1. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १९६/२०२३ दिनांक: ०४/०९/२०२३**
2. **शिक्षक मान्यता कक्षाचे परिपत्रक क्र. २७८/२०२३ दि. ०८/११/२०२३**
3. **विद्यापीठ परिपत्रक क्र. शै. प्रवेश/३१८ दि. २४/०१/२०२४**
4. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ४५/२०२४ दिनांक: ०६/०३/२०२४**
5. **विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ११५/२०२४ दिनांक: ३१/०५/२०२४**

दि. ३१ ऑगस्ट, २०२४ रोजी विविध परीक्षा केंद्रावर पीएच्.डी. प्रवेश परीक्षा (पेट) आयोजित करण्यात आली होती सदर परीक्षेचा निकालदेखील जाहीर करण्यात आला आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना संशोधन केंद्र निवडण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये संशोधन मार्गदर्शकांकडील रिक्त जागांचा तपशील मागविण्यात आला होता. परंतु सद्यस्थितीत काही संशोधन मार्गदर्शकांकडे दरम्यानच्या काळात नव्याने जागा रिक्त झाल्या आहेत किंवा काही संशोधन मार्गदर्शकांना नव्याने संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. तसेच काही संशोधन केंद्रांना नव्याने मान्यता प्राप्त झाली आहे. अशा संशोधन मार्गदर्शकांकडील रिक्त जागा पुढील प्रवेश प्रक्रिया फेरीपर्यंत रिक्त राहू नये, याकरिता मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग व मा. प्राचार्य/संचालक सर्व संशोधन केंद्र यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

ज्या संशोधन मार्गदर्शकांकडे दरम्यानच्या काळात जागा रिक्त झाल्या आहेत किंवा ज्या संशोधन मार्गदर्शकांना नव्याने संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे किंवा ज्या संशोधन मार्गदर्शकांकडे पदोन्नतीमुळे जागा वाढल्या आहेत, अशा संशोधन मार्गदर्शकांनी त्यांच्या लॉगीनमधून रिक्त जागांचा तपशील अद्ययावत करावा. तद्नंतर संबंधित संशोधन केंद्रांनी त्यांचे संशोधन केंद्रामधील मार्गदर्शकांकडील नव्याने अद्ययावत केलेल्या रिक्त जागांना प्रवर्गनिहाय ऑनलाईन पध्दतीने मान्यता द्यावी. ही सर्व प्रक्रिया दि. २५ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत पूर्ण करावी.

जागा अद्ययावत करताना संशोधन केंद्र व संशोधन मार्गदर्शकांनी उपरोक्त संदर्भीय परिपत्रकामधील मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करावी. तसेच संशोधन केंद्रांने त्यांच्या लॉगीनमधून मान्यता दिल्यानंतर तात्काळ रिक्त जागांचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर घोषित केला जाईल. रिक्त जागांचा तपशील घोषित झाल्याबाबतची खात्री संबंधित संशोधन केंद्रांनी खालील लिंकवर करून घ्यावी.

https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/Applicant/SearchGuideVacancies.aspx

संशोधन मार्गदर्शकांकडील रिक्त जागांचा तपशील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये अद्ययावत करण्यात आलेला असल्याने संशोधन केंद्राकडे संबंधित विषयास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत मान्यता विचारात घेऊन विद्यापीठाने मान्यता दिली आहे. तथापि, पीएच्.डी. प्रवेश प्रक्रिया ही २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात सुरू झाली असल्याने संबंधित संशोधन केंद्राकडे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संबंधित विषयास मान्यता असणे अनिवार्य राहील, याची नोंद घ्यावी.

ज्या संशोधन मार्गदर्शकांनी यापूर्वी त्यांच्याकडील रिक्त जागा अद्ययावत केल्या आहेत व त्यांना जागा अद्ययावत करण्याची आवश्यकता वाटत नाही, अशा संशोधन मार्गदर्शकांनी रिक्त जागा अद्ययावत करण्याची आवश्यकता नाही.

सदर प्रक्रिया पूर्ण करताना काही तांत्रिक अडचण आल्यास, प्रशासकीय भवन, पहिला मजला येथील आय. टी. सपोर्ट संपर्क क्र. ०२०-७१५३३६३३ अथवा phdtracking_support@pun.unipune.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ 3228 )
दिनांक: 11/10/2024 )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत:**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
2. मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/ संशोधन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील /संशोधन केंद्रातील सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या निदर्शनास आणून उपरोक्त दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करावी.

D:\PET 2024\Circulars.docx